चित्ररूप

श्यामची आई



साने गुरूजी

करी मनोरंजन जो मुलांचे
जडेल नाते प्रभुशी तयाचे

गमभन
प्रकाशन

चित्ररूप

श्यामची आई

साने गुरूजी

चित्रे

डॉ.भय्यासाहेब ओंकार

१५ रुपये

गमभन
प्रकाशन

प्रकाशक : गमभन प्रकाशन
३७९ शनिवार, पुणे ४११०३०

मुद्रक : प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स,
१०१९ सदाशिव, पुणे ४११०३०

मांडणी : ल.म. कडू

आवृत्ती : जून १९९८

-

साहित्याचे हक्क : पुणे विद्यार्थी गृह, पुणे २
चित्राचे हक्क : साने गुरुजी कथामाला, पुणे

हितगुज

मुलांनो,
साने गुरूजींचे 'श्यामची आई'
हे पुस्तक तुमच्यापैकी काहींनी पाहिले असेल,
निदान सिनेमा तरी पाहिला असेलच.

श्याम म्हणजेच साने गुरुजी.
पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचा जन्म
२४ डिसेंबर १८९९ रोजी झाला. त्यांचे बालपण
रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील पालगड
येथे गेले. त्यांच्या आईने त्यांना घडवले.
त्यामुळेच ते आयुष्यात देशासाठी खूप काम
करू शकले.
मुलांसाठी खूप पुस्तके लिहू शकले.
त्यांचे ११ जून १९५० रोजी निधन झाले.

त्यांचे सर्वात गाजलेले पुस्तक म्हणजे
'श्मामची आई'.
ते मुलांना सहज समजावे म्हणून चित्रांच्या स्वरुपात
आज तुमच्या हाती देत आहोत.
ते तुम्हाला समजेल व आवडेल अशी खात्री आहे.
श्यामच्या आईची शिकवण वाचून व आचरणात
आणून तुम्हीही साने गुरूजींप्रमाणे मोठे व्हावे व
देशासाठी काम करावे हीच आमची अपेक्षा!

– प्रकाशक

आई देह देते व मनही देते.
जन्मास घालणारी तीच व ज्ञान देणारीही तीच.
श्यामला त्याच्या भाग्याने थोर माता मिळाली होती.
आश्रमातील त्याच्या सवंगडयांनी त्याला विचारले,
"श्याम, तुझ्या जीवनात हा कस्तुरीचा सुगंध
कुठून आला ?
ही सेवावृत्ती आणि ही निरहंकारिता कोठून आली ?"
श्याम गहिवरून म्हणाला, "माझ्या आईचे हे देणे !
गडयांनो ! माझ्यात जे काही चांगले आहे
ते माझ्या आईचे आहे.
आई माझा गुरू, आई माझी कल्पतरू,
तिने मला सारे काही दिले. प्रेमळपणे बघावयास,
प्रेमळ बोलावयास तिनेच मला शिकवले.
मनुष्यावरच नव्हे, तर गाईगुरांवर, फुलपाखरांवर,
झाडामाडांवर प्रेम करावयास तिनेच मला शिकवले.
कोंडयाचा मांडा करून कसा खावा व दारिद्र्यातही
स्वत्त्व व सत्त्व न गमाविता कसे रहावे हे तिनेच
मला शिकवले. गडयांनो ! माझे असे काही
सांगण्यासारखे नाही. परंतु माझी आई कशी होती ते
मी तुम्हाला सांगेन. आईचे गुणगान करून हे ओठ
पवित्र करीन. आईच्या आठवतील त्या गोष्टी सांगेन,
तिची स्मृती आळवीन" श्यामने सुरूवात केली...



१

माझ्या आईचे लग्न लहानपणीच झाले.

सासर श्रीमंत होते.

आईच्या अंगावर सोन्यामोत्यांचे दागिने होते.

भरल्या घरात भरल्या गोकुळात ती पडली होती.

कशाला तोटा नव्हता.

माझे वडील खोत होते.
खोत म्हणजे गावचा शेतसारा वसूल करून
सरकारकडे पाठवणारा बिनपगारी दलाल.
खोताने वाटेल त्याला कामाला बोलवावे.
खोत गरिबांच्या कष्टावर जगत असत.

माझ्या आईच्या अंगाखांद्यावर
जे दागिने होते ते कोठून आले?
पाणीदार मोत्यांची नथ!
गरीब बायकांच्या डोळ्यातील
अश्रूंची ती बनलेली होती.

एका अवसेची गोष्ट!

माझे वडील वडवलीहून परत येत असता

झुडपातून अचानक मांग पुढे आले.

भाऊंना खाली पाडण्यात आले.

मांगांच्या हातातील सुरा चमकत होता.
भाऊ त्या मांगांना म्हणाले,
"नका रे मला मारू!
ही अंगठी, हे सल्ले जोडे,
हे शंभर रूपये घ्या. मला सोडा."

भाऊंच्या बरोबरचा गडी पळत सुटला.
तो घरी आला.
घरात बातमी येताच आकान्त झाला.

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा



आईने देवाला आळविले,
"देवा, माझे कुंकू राख."
भाऊ घरी आले.
त्या वर्षापासून आई सावित्रीचे व्रत करी.
या व्रतात तीन दिवस
वडाला १०८ प्रदक्षिणा
घालावयाच्या असतात.

त्यावेळी मी आठ-नऊ वर्षांचा असेन.
आई हिवतापाने आजारी होती.
आई म्हणाली, "श्याम, मी आजारी आहे
मी तीन प्रदक्षिणा घालीन.
बाकीच्या तू घाल."
मी म्हटले, "मला लाज वाटते."

आई म्हणाली,
"पाप करताना लाज वाटू दे.
चांगले काम करताना लाज नको."

ते, शब्द माझ्या मनात खोल गेले.
मी प्रदक्षिणा घातल्या.



इतर मुलांनी फुले तोडण्याआधीच
आपल्याला फुले मिळावीत म्हणून चोरपावलाने
जाऊन मी गुलबाक्षीच्या कळ्या तोडून आणल्या.
मी ताम्हन घेतले व त्यात पाणी घालून
कळ्या टाकून ठेवल्या. पण
कळ्या नीट फुलल्या नाहीत.

आईने फुले मागताच मी ती परडीत नेऊन दिली.
इतक्यात सारी मुले आली. आईला म्हणाली,
"श्यामने आणली ही सारी फुले तोडून!
आम्हाला एकही ठेवले नाही याने!"

आई म्हणाली,
“श्याम! दुसऱ्याच्या घरची फुले त्यांना
न सांगता सवरता आणू नयेत
आणि सर्वात वाईट म्हणजे अशी मुकी
फुले तोडून आणणे.
झाडे म्हणजे फुलांच्या माता.
झाडांच्या मांडीवरच कळ्या छान फुलतात.
देवाला एक फूल मिळाले तरी पुरे,
परंतु ते नीट फुललेले वहा,
श्याम! मुक्या कळया नको हो तोडू,
त्यांना नीट फुलू दे.”

५



लहानपणापासून दोन्ही वेळा स्नान करण्याची
मला सवय लागली आहे.
एके दिवशी मी नेहमीप्रमाणे खेळून घरी आलो.
संध्याकाळची आंघोळ, तिला फारसे पाणी लागत नसे.
आईने खसखसा अंग चोळून दिले.
उरलेले पाणी मी अंगावर घेतले.
आई आली व तिने माझे अंग पुसले.
मी म्हटले, “माझे तळवे ओले आहेत,
त्यांना माती लागेल, माझे तळवे पूस.”

आई म्हणाली, "कशाने पुसू?"
"तुझे ओचे पसर, त्यावर मी पाय ठेवीन."
आईने आपले ओचे पसरले.
मी माझे पाय त्यावर ठेवले.

मी देवाची फुले काढू लागलो.
आई निरांजन घेऊन आली व म्हणाली,
"श्याम! पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस!
तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो.
देवाला सांग शुध्दबुध्दी दे म्हणून."

गडयांनो! किती गोड शब्द!



६

माझ्या वडिलांना त्यांच्या भावांनी घराबाहेर हुसकून दिले. ज्या घरात राहून त्यांनी इतर सर्वांना दही दूध दिले परंतु स्वतः चिंचेचे सारच खाल्ले त्या घरातून त्यांना बाहेर जाण्यास सांगण्यात आले. आम्ही आईच्या माहेरी जाऊन राहिलो, पण तिला ते अपमानाचे वाटे. ती माझ्या वडिलांना म्हणाली, "माझ्या पाटल्या, माझी नथ विका. पण स्वतंत्र गवतारू झोपडी बांधा."
माझी आई सांगते की,
स्वातंत्र्य मिळवण्यासाठी दागदागिने फेकून दे.

आमची झोपडी तयार झाली.
रात्री आम्ही अंगणात बसलो होतो.
आकाशात तारा तुटताना पाहिला.
तेव्हा आई म्हणाली,
"श्याम मला बोलावण्यासाठी तर तो
आला नाही ना?"
मी म्हणालो, "नाही हो आई!
तो हे आपले स्वतंत्र घर पहाण्यासाठी
आला आहे. हे आपले घर स्वर्गापेक्षा छान आहे.
कारण आपल्या घरात प्रेम आहे.
तू आहेस."



एक दिवस झाडावरून एक
पाखराचे लहान पिल्लू पडले.
आम्ही त्या पिल्लाला दाणापाणी देऊ लागलो.
आई म्हणाली, "हे जगणार नाही."
शेवटी चोच वासून ते मरून पडले.

आईला जाऊन विचारले,
"आई, या पिलाला कोठे पुरू ?"
आई म्हणाली,
"त्या शेवंतीजवळ किंवा मोगऱ्याजवळ पुरा.
तुम्ही त्या पिलाला प्रेम दिले आहे.
त्या फुलात ते तुमच्यासाठी येईल
व तुम्हाला गोड वास देईल."
आम्ही त्याला शेवंती व मोगरी याच्यामधे पुरले.
आम्ही घरी आलो.
माजघरात बाजूला बसलो व रडत होतो.
"का रे बाजूला बसलास ?" आईने विचारले.
"मी त्याचे सुतक धरणार आहे." मी म्हणालो.
आई हसली व म्हणाली,
"अरे वेड्या, सुतक नको हो धरावयाला.
वाईट नको वाटून घेऊ.
देवाच्या लेकरास जे द्याल ते शतपटीने वाढवून
देवबाप्पा देत असतो."



मला पोहायला शिकवण्यासाठी
एक दिवस माझे मित्र आले. मी जायला तयार नव्हतो.
आईला राग आला.
"बघू दे कसा येत नाही तो!" असे म्हणून
तिने मला झोडण्यास प्रारंभ केला.
"जातो मी. नको मारू." मी म्हटले.

विहिरीवर आम्ही गेलो.
मला कुणीतरी पाण्यात ढकलले.
मला पोहता येऊ लागले.
पण माझा आईवरचा राग गेला नव्हता.

आईने माझ्या पाठीवरच्या
वळाला तेल लावले.
ती म्हणाली, "तू भित्रा आहेस
असे का जगाने तुला म्हणावे?
श्यामला कोणी नावे ठेवू नयेत
म्हणून मी त्याला मारले."



आई देवळात पुराणास गेली होती.
आम्ही भजन करण्याचे ठरवले.
आम्ही डबा बडवून आणि
टाळ वाजवून भजन म्हणू लागलो.

देवळातील पुराणाला अडथळा आला.
“हा श्यामचा चावटपणा.
येथे पुराण चालले आहे समजू नये का?
असे कोणी म्हणाले.

आई रागाने घरी आली आणि म्हणाली,
"तूला लाज नाही वाटत धुडगुस घालायला ?."
आईने म्ला शिकविले,
'आपली पार्थना दुसऱ्याच्या प्रार्थनेच्या
आड येऊ नये,
आपली पूजा दुसऱ्याच्या
पूजेच्या आड येऊ नये.



१०

मी दापोलीला इंग्रजी शिकण्यासाठी राहिलो,
एका शनिवारी मी घरी आलो.
माझ्या वाढलेल्या केसांकडे पाहून
वडील म्हणाले, “हजाम मिळत नाही वाटते ?
नुसता कावळा झाला आहेस.”
मी प्रेमाचा भुकेला होऊन आलो होतो.
मला शिव्या मिळाल्या.

मी आईला म्हटले, “मी निघून जातो.”
आई म्हणाली, “आईबापाच्या धर्मभावनांसाठी
तू हजामत करण्यासही तयार नसावे का ?”
मी म्हटले, “केसात कसला ग धर्म ?”
आई म्हणाली, “प्रत्येक गोष्टीत धर्म आहे.
मोह सोडणे म्हणजे धर्म.”
मला दुसऱ्या दिवशी कळले की
माझे भले व्हावे म्हणून माझे वडील
गणपतीवर एकादष्णी करीत असत.
किती त्यांचे प्रेम !



मे महिन्याच्या सुट्टीत मी घरी गेलो
म्हणजे आईला आधार वाटे.
आईला मी दळण दळू लागे.
आई ओव्या म्हणे. त्यात "श्याम बाळ"
असे माझे नाव गुंफीत असे.

मी धुणी धुवायला लागे.
आई म्हणे, "श्याम, लोक तुला हसतील."
मी म्हणे, "तुझी चौघडी मी पांघरतो.
मग धुवायला का लाज वाटेल?"

पुरूषांच्या हृदयात कोमलता, प्रेम, सेवावृत्ती या गोष्टी उत्पन्न झाल्याशिवाय त्यांचा पूर्ण विकास होणार नाही. स्त्रियांच्या हृदयात धैर्य, प्रसंगी कठोर होणे हे गुण येतील तेव्हाच त्यांचा पूर्ण विकास होईल.

लग्न करून पुरुष कोमलता शिकतो.
स्त्री बुद्धिचे गुण शिकते.
मानवाचे ध्येय अर्धनारीनटेश्वर हे आहे.

प्रेम, दया, कष्ट या स्त्री गुणांशी
आई माझे लग्न लावीत होती!

१२

रस्त्यावर एक म्हारीण बसली होती.
तिच्या डोक्यावरचा गोयला खाली पडला होता.
तिच्या डोक्यावर तो देण्यास मला आईने सांगितले.
मी तिच्या डोक्यावर मोळी दिली.
तेव्हा भोवतालचे लोक ओरडले,
"श्याम, अगदीच चवलास तू.
अरे काही ताळतंत्र तरी!"
मी म्हणालो,
"मी घरी जाऊन आंघोळ करणार आहे."

नंतर आईने तिचा गोयला विकत घेतला.
तिला पत्रावळीवर भात आणून दिला.
तिने तो अंगणाच्या कडेला बसून खाल्ला.
ती म्हणाली, "देव तुमचे भले करो."
आई म्हणाली, "श्याम, देवाला सारी प्रिय आहेत.
कारण सारी त्याचीच.
तू माझा म्हणून मला आवडतोस.
तशी आपण सारी देवाची म्हणून
सारी त्याला आवडतो.
देव सर्वत्र आहे म्हणून पुराणात सांगतात.

त्यावर्षी पाऊस पडेना,
अवर्षण जावे म्हणून आमच्या गावात
शंकराला कोंडण्याची जुनी पद्धत आहे.
सारा गाभारा पाण्याने भरून टाकावयाचा,
सारा गाव यात सहभागी होई.
आई मला म्हणाली,
"विहिरीतून एकेक तांब्या आण
आणि देवावर ओत."

मी म्हणालो,
“एवढासा तांब्या काय घेऊन जायचे ?
लोक हसतील.”
आई म्हणाली, “कोणी हसणार नाही.
आपल्या शक्तिबाहेर करू पहाणे तेही वाईट,
आळशासारखे बसून रहाणे तेही वाईट.
तू पाणी घाल.”

अखेर मी देवळात जाऊन पाणी ओतले.
मुंगीने मुंगीप्रमाणे काम करावे, हत्तीने हत्तीप्रमाणे.





मी दापोलीहून घरी आलो.
वर्गातली पुस्तके घ्यायला मजजवळ पैसे नव्हते.
म्हणून मी पाहुण्यांच्या खिशातले पैसे चोरले.

जेवण झाल्यावर पाहुणे नोटा मोजू लागले.
एक नोट कमी भरली.

आई म्हणाली, ''श्याम पैसे चोरणार नाही.
चोरले तर कबूल करील.''

माझ्या डोळ्यातून पाणी येऊ लागले.
मी कबूल केले,
"आई तुझ्या श्यामनेच नोट घेतली."

आईला वाईट वाटले.
"श्याम पुन्हा नको हो हात लावू.
हाच पहिला व शेवटचा हात लावलास हो."
मी म्हणालो,
"आई, मी पुस्तकासाठी चोरी केली."

आई म्हणाली,
"पहिलीच्या पुस्तकात चोरी कधी करू नये
हे वाचलेस ते तर अजून शिकला नाहीस.
मग आणखी दुसरी पुस्तके कशाला?"

'चोरी करू नये' हे वाक्य
मी पढलो होतो पण शिकलो नव्हतो.

१६

वडिलांनी खाऊसाठी दिलेले पैसे
साठवून मी भावाला कोट शिवला.
पाऊस मी म्हणत होता.
पिसईचा पऱ्हा दुथडी भरून वहात होता.
तरीही मी घरी जाण्यास निघालो.

हृदयात प्रेमपूर आला होता.
तो नदीनाल्यास थोडीच भीक घालणार!

धाकटच्या भावाने माझे लहानसे गाठोडे सोडले.
त्यात त्याला कोट सापडला. नवीन कोट!
तो कोट नव्हता, ते हृदय होते, प्रेम होते!
ती आईची फलद्रूप झालेली शिकवण होती.

पुरूषोत्तमला तो कोट खूप आवडला.
आई गहिवरून म्हणाली,
"श्याम, तू वयाने मोठा नाहीस,
पैशाने मोठा नाहीस, शिकून मोठा नाहीस,
परंतु मनाने मोठा आजच झालासर हो!

हेच प्रेम बाळांनो पुढेही ठेवा.



श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

लाडघर येथील तामस्तीर्थाला नवस फेडण्यासाठी
आई व मी निघालो.
बैलगाडीत आई व मी दोघेच होतो.
मी व माझी आई, माझी आई आणि मी.
आमच्या दोघांचे त्या दिवशी जग होते.
मी आईच्या मांडीवर डोके ठेवून पडलो होतो.

आई ओव्या म्हणू लागली.

'घनदाट या रानात। धो धो स्वच्छ वाहे पाणी
माझ्या श्यामच्या जीवनी। देव राहो ॥

आम्ही समुद्रावर गेलो.
आईने समुद्राची पूजा केली.
चार आणे समुद्रात फेकून दिले!

मोत्याच्या राशी ज्याच्या पोटात
त्या रत्नाकराला आईने चार आणे दिले!

ती कृतज्ञता होती.

सावकाराकडून वामनराव नावाचे गृहस्थ
कर्जवसुलीसाठी वडीलांकडे आले होते.
वडिलांजवळ पैसे नव्हते.
तेव्हा वामनराव म्हणाले,
"सावकाराचे देणे देण्यासाठी बायको विका."

हे वाक्य ऐकताच आई विजेसारखी उठली
आणि दारात येऊन म्हणाली,
"या ओटीवरून चालते व्हा."

वामनराव खवळून म्हणाले,
“ठीक आहे, तुमच्या घरादाराची जप्ती करीन.”
आई साऱ्या संकटांना तयार होती.
ती म्हणाली,
“अशी घाणेरडी बोलणी ऐकून घेणार नाही.”

पैशासाठी मला दापोलीची शाळा सोडावी लागली.
मी आईला म्हणालो,
“मी औंधला जाऊन माधुकरी मागून
शिक्षण पुरे करीन,”

आई म्हणाली,
“जा. माधुकरी मागणे पाप नाही.”.
मी निघालो.

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

१८



कोर्टात सावकाराचे देणे योग्य ठरले
व सारी मिळकत जप्त करून तिचा लिलाव व्हावा
असा निकाल देण्यात आला.
घरावर जप्ती आली. होते नव्हते ते खोलीत टाकून
सावकाराने कुलूप ठोकले. सील केले.

आई आतून बाहेरून भाजून निघाली होती.
आई म्हणाली, "ज्याला भीत होते ते शेवटी झाले!
आता जगणे व मरणे काय सारखेच आहे."

आई त्या दिवसापासून अंथरूणाला खिळली.
ती वातात बडबडत होती,
"श्याम, मी दळायला लावले म्हणून रूसलास?
आता नाही हो दळायला लावणार. आता संपले."

शेवटी उर्ध्व लागला.
आईचे ओठ हलत होते.
ते ओठ राम म्हणत होते का श्याम म्हणत होते?

अखेर जगातील जंजाळातून सुटून
आई मोठ्या आईच्या कुशीत प्रेमाची ऊब मिळावी
म्हणून निघून गेली.

आईजवळ मी नव्हतो. मी दूर शिकत होतो.
आई रात्री माझ्या स्वप्नात आली व म्हणाली,
"का रे नाही मला भेटायला आलास?
तुला त्यांनी कळवले नाही का?"

सकाळी उठल्यावर ते स्वप्न आठवून
मला कसेसेच झाले.
मी घरी गेलो.
आई केव्हाच देवाघरी गेली होती.

घरात एक मिणमिण दिवा जळत होता.
भेसूर शांतता होती.

दुर्वांची आजी म्हणाली,
"तुझीच आठवण काढीत होती हो श्याम!"

सर्व भारतातील माता श्यामच्या होऊ देत,
एकच नव्हे तर अनेक आया
श्यामला मिळू देत,
यासाठी माझी आई निघून गेली असेल.

ह्या अनंत आया पाहण्याची दिव्य दृष्टी
देऊन आई गेली.



करी मनोरंजन जो मुलांचे
जडेल नाते प्रभूशी तयाचे

साने गुरुजी

गमभन
प्रकाशन